उत्कृष्ट क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रूट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# आपला महाराष्ट्र

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

मूल्य २.००

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२३८ ■ सोमवार १ जुन २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

Post Regd.No./DHL/53/24-26

।। श्री गणेशाय नमः ।।
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स


१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे

### लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थींच्या

# ई-केवायसीला यापुढे मुदतवाढ मिळणार नाही ऐंशी लाख महिलांचा लाभ बंद करण्यात आला



**मुंबई, दि. ३१ : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून तब्बल ऐंशी लाख महिला अपात्र ठरल्याची माहिती समोर आली आहे. सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लाडकी बहीण योजना यापुढेही सुरूच राहणार आहे. पण, योजनेत नव्याने नोंदणी करण्यात येणार नाही. त्याशिवाय ई-केवायसीला यापुढे मुदतवाढही मिळणार नाही. तीस एप्रिलला ई-केवायसीची मुदत संपली असून पडताळणीनंतर तब्बल ऐंशी लाख महिलांचा लाभ बंद करण्यात आला आहे. दरम्यान, सरकारच्या या निर्णयावर खासदार सुप्रिया सुळे यांनी जोरदार टीका केली आहे. दीड वर्षानंतर ऐंशी लाख महिलाना वगळण्याची वेळ राज्यकर्त्यांवर आली. याचा अर्थ हा निर्णय म्हणजे अंमलबजावणी प्रक्रियेत काम करणाऱ्या सर्वांचेच हे दारूण अपयश आहे. राज्यकर्ते याबाबत काय प्रायश्चित्य घेणार, असा प्रश्न खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला आहे.**

लोकसभा निवडणुकीत बसलेल्या फटक्यानंतर महिला मतदारांना आपल्याकडे वळवण्यासाठी महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणली. जुलै २०२४ पासून ही योजना सुरू करण्यात आली. त्यानंतर पात्र नसलेल्या लाभार्थ्यांची ओळख पटवण्यासाठी आणि कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी सरकारने ई-केवायसी मोहीम हाती घेतली होती. विधानसभा निवडणुकीआधी महायुती सरकारने महिलांना दरमहा पंधराशे रुपये देणारी ही योजना आणली (पान ४ वर)

### पुणे-पिंपरी मधील

## विषारी दारुचे बळी मृतांची संख्या बावीस

पुणे, दि. ३१ : पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये घडलेल्या विषारी दारू प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. विषारी दारूकांडात मृतांचा आकडा आणखी वाढला असून आता एकूण मृतांची संख्या २२ वर पोहोचली आहे. उरळी कांचन येथील बत्तीस वर्षीय रिक्षाचालक उमेश अवचर याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. दरम्यान, या प्रकरणी आठ संशयितांना अटक करण्यात आली आहे. तर पथकातील चार अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

या प्रकरणात तपासादरम्यान धक्कादायक माहिती समोर आली आहे. अधिक नफा मिळवण्यासाठी संशयित आरोपी योगेश वानखेडे याने दारूमध्ये मिथेनॉल हे घातक रसायन मिसळल्याचे पोलिसांच्या तपासात उघड झाले आहे. उरळी कांचन परिसरातील (पान ४ वर)

# निरनिराळ्या दहा मागण्या मान्य झाल्याने मनोज जरांगे यांचे उपोषण मध्यरात्री मागे

**जालना, दि. ३१ : मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी अंतरवली सराटी येथे पुन्हा एकदा आंदोलनाचे हत्यार उपसणारे मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी अखेर मध्यरात्री उपोषण मागे घेतले. राज्य सरकारच्या शिष्टमंडळासोबत प्रदीर्घ काळ चाललेल्या सकारात्मक चर्चे नंतर जरांगे यांनी हा निर्णय जाहीर केला. ज्यामुळे मराठा आंदोलकांमध्ये काहीसा दिलासा मिळाला आहे.**



कडक उन्हात कोणत्याही मंडपाची सुविधा नसताना मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसले होते. सततच्या उन्हामुळे त्यांची प्रकृती खालावली होती. शिष्टमंडळ भेटीला येण्यापूर्वीच त्यांना उलट्यांचा त्रास सुरू झाल्याने आंदोलनस्थळी उपस्थितांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मसुदा नाकारल्यापासून तोडग्यापर्यंत सरकारने यापूर्वी पाठवलेला मसुदा सुरुवातीला जरांगे-पाटील यांनी अमान्य केला होता आणि शिष्टमंडळाला माघारी पाठवले होते. मात्र, परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पडद्यामागून हालचाली सुरू झाल्या. अंतरवली गावातील सरपंच पांडूरंग तारख यांच्या निवासस्थानी मराठा आरक्षण अभ्यासक, मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि भाजप आमदार प्रसाद लाड यांची बैठक पार पडली. या बैठकीत चर्चेतून मार्ग काढण्याचा प्रयतक करण्यात आला. त्यानंतर विखे-पाटील आणि प्रसाद लाड पुन्हा एकदा जरांगे-पाटलांकडे गेले. तब्बल दीड तास चाललेल्या सविस्तर चर्चेनंतर, सरकार आणि आंदोलनकर्ते (पान ४ वर)

### मा.आ.शरद पाटलांच्या मागणीची खिल्ली उडविली

# पुर्व नियोजना अभावी केव्हाही पांझरेत पाणी सोडले जाई प्री-प्लॅनिंगनेच आवर्तन सोडण्यात आले - मनोहर भदाणे

**धुळे, दि.३१ - धुळे ग्रामीणमध्ये मे च्या उत्तरार्धात आणि जुनच्या पुर्वार्धात पाण्याची मोठी टंचाई निर्माण होत असते. पुर्वी नियोजना अभावी केव्हाही अक्कलपाड्याचे आवर्तन सोडले जात होते. आता मात्र जिल्हा प्रशासन आणि आमदार राम भदाणे यांनी एकोणतीस ऑक्टोबरलाच आवर्तन नेमके केव्हा सोडायचे. याचे नियोजन केलेले होते. प्री-प्लॅनींगनेच आवर्तन सोडण्यात आले आहे. यामुळे योग्य वेळी आणि योग्य क्षणी जनतेला दिलासा मिळाला असल्याचे जिल्हा परीषदेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब मनोहर भदाणे यांनी सांगितले. शिंदे सेनेच मा.आ. शरद पाटील सातत्याने आवर्तन पांझरेत सोडण्याची मागणी करत होते. मनोहर भदाणेंच्या वक्तव्यातून शरद पाटलांच्या मागणीची खिल्ली उडविण्यात आली आहे.**



आज रविवारी सकाळी नऊला माजी अध्यक्ष मनोहर भदाणे यांच्या हस्ते जलपूजन करून अक्कलपाड्याचे (पान ४ वर)

### बँकेतच सुरक्षित नाही सोने

## अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल

नांदेड, दि. ३१ : नांदेड शहरातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या डॉक्टर लेन शाखेत ग्राहकांचे सोने सुरक्षित नसल्याचा प्रकार पुढे आला आहे. बँकेच्याच जबाबदार अधिकाऱ्यांनी ग्राहकांनी तारण ठेवलेल्या तब्बल ८० तोळे सोन्यावर डल्ला मारला आहे. अधिकाऱ्यांनीच हा विश्वासघात केल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बँकेचे कॅश इन्चार्ज आदित्य प्रकाश सेनगावकर आणि सर्व्हिस मॅनेजर जीवन माधवराव जगदाळे यांनी संगनमत करून हा गैरप्रकार घडवून आणला. या दोघांनी आठ ग्राहकांनी तारण ठेवलेले ३९१.६० ग्रॅम सोने परस्पर काढून घेतले.

# नगरपरिषदेचे कर्मचारी शहरातील कोणत्याही राजकारण्यांचे घरगडी नाहीत - नगराध्यक्षा चौधरी

**नंदुरबार,दि.३१ (प्रतिनिधी) - मी सांगेल तसे आणि तेच काम नगर परिषदेचे काम होईल, अशी आजवर सुरू असलेली परंपरा आता बंद झाली आहे. नगर परिषदेचे कर्मचारी शहरातील कोणत्याही राजकारणी नेत्याचे घरगडी नाहीत. यापुढे केवळ आणि केवळ नियमानुसारच नगर परिषदेचे कर्मचारी काम करतील, अशा शब्दांत तळोद्याच्या नगराध्यक्ष भाग्यश्री चौधरी यांनी विरोधकांवर टीका केली आहे.**



तळोदा नगर परिषदेच्या नुकत्याच झालेल्या सर्वसाधारण सभेत शहरातील स्वच्छतेच्या मुद्द्यावरून विरोधी बाकावरील सदस्यांनी सत्ताधाऱ्यांना घेरण्याचा प्रयतक केला होता. सदस्य व पदाधिकाऱ्यांनी सांगूनही न.प.च्या स्वच्छता विभागाचे कर्मचारी शहरात स्वच्छता करीत नसल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. त्यावेळीही नगराध्यक्ष भाग्यश्री चौधरी यांनी खासगी जागांवरील नव्हे तर केवळ सार्वजनिक जागा स्वच्छ करण्याची न.प. कर्मचाऱ्यांची जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले होते.

यानंतर पुन्हा नगराध्यक्ष भाग्यश्री चौधरी व राष्ट्रवादी काँग्रेसचे पॅनलप्रमुख योगेश चौधरी यांनी पत्रकार परिषद घेऊन विरोधकांचे मुद्दे (पान २ वर)

### हिमाचलमध्ये टॅक्सी दरीत कोसळल्याने आठ ठार

चंबा, दि. ३१ : हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यातील बैरागढ़-साच पास-किलाड मार्गावर शुक्रवारी रात्री एका गाडीचा अपघात झाला. त्यात दोन मुलांसह आठ जणांचा मृत्यू झाला. यात बंगळूरुहून आलेले पर्यटक होते. त्यांची गाडी रस्त्यापासून सुमारे पाचशे मीटर खाली खोल दरीत कोसळली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. माहितीनुसार बंगळूरुहून आलेल्या पर्यटकांच्या दोन कुटुंबांनी चंबा जिल्ह्यातील डलहौजी येथून शुक्रवारी एक टॅक्सी (मारुती अर्टिगा कार) बुक केली. दोन्ही कुटुंबे दुपारी साच पास जोत परिसरात बर्फ आणि पर्वतांचा आनंद घेण्यासाठी निघाले. त्यावेळी हा अपघात झाला.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

## ना. जयकुमार रावल यांनी केले अभिवादन

दोंडाईचा, दि.३१ - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त दोंडाईचा येथील राणीपुरा भागातील त्यांच्या स्मारकास राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी पालकमंत्री रावल यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांच्या आदर्श विचारांमधून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. समाजहित, न्यायप्रियता आणि लोककल्याणकारी (पान २ वर)

# पन्नास ह. सिडबॉलची पहिल्या टप्प्यात निर्मिती हरीत धुळे अभियानाचा पहिला टप्पा यशस्वी

**धुळे, दि.३१ - शहराचे आमदार अनुपभैय्या अग्रवाल यांनी संकल्पित केलेल्या हरीत, सुंदर व स्वच्छ धुळे या महत्त्वाकांक्षी अभियानाच्या दिशेने आज एक ऐतिहासिक पाऊल टाकण्यात आले. धुळे महानगरपालिका, ग्रीन धुळे वृक्ष टीम तसेच विविध सामाजिक, पर्यावरणीय आणि सेवाभावी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने मयूर गार्डन, आयुक्त निवास येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य सीडबॉल (बीजगोळा) निर्मिती उपक्रमाला धुळेकरांनी अभूतपूर्व प्रतिसाद देत हून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदविला.**



या उपक्रमाला धुळे शहराचे आमदार अनुपभैय्या अग्रवाल, महापौर सौ. मायादेवी परदेशी, महापालिका आयुक्त नितीन कापडणीस, उपमहापौर जोशनाताई पाटील, महिला व बालकल्याण सभापती लताताई सोनार, माजी महापौर प्रतिभाताई चौधरी, नगरसेवक ललित गंगाधर माळी, कृपेश नांद्रे, संध्या कदम, धीरज कलंत्री, प्रभावती शिंदे यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी उपस्थित होते. या उपक्रमात ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक व वृक्षसंवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञ नानासाहेब उत्तमराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सीडबॉल निर्मितीचे काम करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते दिनेश भाऊ पोद्दार, दिनेश भाऊ बागुल, धीरज जगताप, ॲड. जगदीश सूर्यवंशी, नितीन जाडे, कुणाल रणाकर, भारती जैन, प्रभा परदेशी, चेतन बरडिया यांच्यासह महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकारी संपदा कुलकर्णी, अभियंता ओगले साहेब, (पान २ वर)

# अहिल्यादेवी होळकर योजनेची अंमलबजावणी येत्या दहा दिवसात कर्जमाफ : कृषी मंत्री भरणे

अहिल्यानगर, दि. ३१ : पुण्यश्लोक आहिल्यादेवी यांच्या नावाने यावर्षी शेतक-यांसाठी कर्जमाफी योजना जाहीर झाली आहे. येणा-या दहा दिवसांमध्ये कर्जमाफी केली जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि सुनेत्रा पवार यांची परवानगी घेऊन मी कर्जमाफीच्या लाभाविषयी बोलत आहे, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त चौंडी (अहिल्यानगर) येथील





कार्यक्रमात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. या भाषणात त्यांनी शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा केली आहे.

अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त झालेल्या कार्यक्रमात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी जाहीर केले की, राज्य सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी जाहीर केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुण्यश्लोक आहिल्यादेवी यांच्या नावाने यावर्षी शेतक-यांची कर्जमाफी योजना जाहीर केली आहे. येणाऱ्या आठ-दहा दिवसात अहिल्यादेवींच्या नावाने कर्ज माफी होणार आहे. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची परवानगी घेऊन मी कर्जमाफीची घोषणा करीत आहे. अहिल्यादेवी होळकर यांनी त्या (पान २ वर)

# राज्य उत्पादन शुल्कच्या काही कर्मचाऱ्यांच्या आर्थिक मागण्यांमुळे दारू दुकानदार त्रस्त

**धुळे, दि.३१ - राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या काही कर्मचाऱ्यांनी सुरू केलेल्या हप्ता मागणीतून दारू दुकानदारांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

सन २०१६ - १७ साठी परवाने नूतनीकरण संदर्भात अधिकारी विविध दारू दुकानांना, बियर बारना भेटी देत असतात. यावेळी लायसन रिन्यू करण्यासाठी एक वेगळी रक्कम मागण्यात येत असल्याने या क्षेत्रातील दुकानदार वैतागलेल्या आहेत. शासनाच्या नियमाप्रमाणे राज्य उत्पादन शुल्कच्या अधिकाऱ्यांनी अवैद्य दारू विक्रीला आळा घालणे हे महत्त्वाचे काम आहे. मात्र सोडा गाडी, अंडा विक्री गाडी, ढाबे अशा अनेक ठिकाणी बेकायदा दारूची विक्री होते. त्यामुळे आधुनिक अधिकृत परवानाधारकांना व्यवसायातून पाहिजे तसा मोबदला मिळत नाही, या मुळे बियर बार परमिट रूम, वाईन शॉप दुकानदार या लायसन धारक व्यवसायिकांचा व्यवसाय आर्थिक अडचणीत येऊ लागला आहे. या सगळ्यांमध्ये राज्य उत्पादन शुल्कच्या काही कर्मचाऱ्यांकडून नियमानुसार असणाऱ्या फी व्यतिरिक्त लायसन्सच्या नूतनीकरणासाठी वेगळी रक्कम मागितली जात असल्याने सर्वत्र नाराजीचा सूर उंटू लागला आहे. या सगळ्यातच मध्य प्रदेश, राजस्थान, हरियाणा व गोवा येथील दारू देखील जिल्ह्यात येते. यामुळे एका वेगळ्या स्पर्धेला सामोरे जावे लागते. (पान २ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,40,600 रु.+3% GST
सोने- 24 K -1,53,500 रु.+3% GST
चांदी- 2,62,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

### जमाव बंदीचे उल्लंघन वैभव पाडवीवर हल्ला

नंदुरबार, दि.३१ (प्रतिनिधी) - अक्कलकूवा तालुक्यातील वाण्याविहिर फाटयाजवळ२९ मे च्या रात्री आठ वाजून वीस मिनिटांनी युवकावर तरुणांनी हल्ला करीत वाहनाची तोडफोड करीत नुकसान केले.जमावबंदी आदेशाचे उल्लंघनसह इतर कलमाखाली चौदा जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या मारहाणीत वैभव नागेशकुमार पाडवी हा युवक जखमी झाला आहे. वैभव याला मारहाण करीत असतांना चार चाकी वाहन जी जे १६ एफ ए ४१०० या वाहनाची तोडफोड केली. याप्रकरणी पोना सुनिल तुकाराम पवार (पान २ वर)

# शिरपूरला भल्या पहाटे पावसाच्या सरी उष्णता कमी झाली पण शेतकरी चिंतेत

**शिरपूर,दि.३१ (प्रतिनिधी) - मे महिन्याच्या अखेरच्या दिवशी पहाटे सुमारे चारच्या सुमारास झालेल्या पावसाने परिसराला अनपेक्षित दिलासा दिला. गेल्या अनेक दिवसांपासून तीव्र उकाडा, वाढलेले तापमान आणि दमट वातावरण यामुळे नागरिक हैराण झाले होते. अशा परिस्थितीत पहाटेच्या सरींमुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून नागरिकांनी काहीसा दिलासा व्यक्त केला आहे. मात्र, या अवकाळी स्वरूपाच्या पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.**

गेल्या काही दिवसांपासून वातावरणात बदल जाणवत होता. दिवसभर कडक ऊन असले तरी सायंकाळच्या वेळी वाऱ्याचा वेग वाढत होता. रात्री ढगांची गर्दी दिसत होती आणि काही भागांत विजांचा कडकडाटही होत होता. तालुक्यातील वरला परिसरात मान्सूनपूर्व पावसाने हजेरीही लावली. दरम्यान मे महिन्याच्या शेवटच्या दिवशी ३१ मे रोजी पहाटे पावसाने हजेरी लावत उन्हाच्या झळा काही प्रमाणात कमी केल्या.

पहाटेच्या पावसानंतर वातावरणातील उष्णता कमी झाली. रस्ते, झाडे आणि परिसर धुऊन निघाल्याने सकाळचे वातावरण प्रसन्न झाले होते. विशेषतः वृद्ध, लहान मुले आणि दिवसभर बाहेर काम करणाऱ्या नागरिकांना या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला. गेल्या काही दिवसांपासून रात्रीच्या वेळीही उकाडा जाणवत असल्याने नागरिक त्रस्त झाले होते. पावसानंतर मात्र तापमानात काही प्रमाणात घट झाल्याचे जाणवले.

दुसरीकडे, या पावसाकडे शेतकरी मात्र सावध नजरेने पाहत आहेत. पारंपरिक अनुभवाच्या आधारे अनेक शेतकरी असे मानतात की मे महिन्याच्या अखेरीस किंवा जूनच्या सुरुवातीस झालेला अवकाळी पाऊस काहीवेळा पुढील (पान २ वर)

सेंद्रिय जांभुळ

संकेत नित्या फार्मचे उत्कृष्ट सेंद्रिय जांभुळ उपलब्ध
✻ संपर्क ✻
वेळ : सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत
दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग-धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६

# जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे औचित्य निमगुळला व्यसन सोडणाऱ्यांचा सत्कार

**निमगुळ, दि.३१ - जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे औचित्य साधत निमगुळ येथे कृषी दुकानदार व शेतकऱ्यांनी तंबाखू मुक्तीची शपथ घेतली. तंबाखू सोडणाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.**



परिसरात तंबाखू तसेच तंबाखूजन्य पदार्थ सेवन करणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत जात आहे, या दिवसाचे औचित्य साधून मुख्य उद्देश लोकांना तंबाखूच्या सेवनामुळे होणाऱ्या गंभीर आजाराविषयी जागृत करणे आणि त्यांचे व्यसन सोडण्यासाठी प्रवृत्त करणे हा आहे, बऱ्याच वेळा तंबाखू खाणे हे व्यसन नाही असे लोकांना वाटते तसा तंबाखू हा मादक पदार्थ नाही मात्र गंभीर दुष्परिणाम करणारा पदार्थ आहे तंबाखू मध्ये निकोटीन हा शरीराची अत्यंत हानी करणारा पदार्थ असतो, अशुद्ध द्रव्यांनी बनलेला असतो तपकीर, गुटखा, मिश्री, बीडी, सिगारेट , मावा, तंबाखू या सर्व प्रकारच्या तंबाखूजन्य पदार्थामुळे शरीराला धोकादायक असतात तंबाखू मुळे हृदयरोग, फुफुसाचे आजार, टीबी, पक्षाघात, नपुसकत्व, कमी वजनाचे बाळ जन्माला येऊन मृत्यू येणे तसेच तोंड, जीभ, घसा, अन्ननलिका, आतडी व इतर अवयवांचे कॅन्सर होतात सतत दाढेत धरल्याने तोंडाचा कॅन्सर होतो भारतात सध्या आहे त्याच प्रकारे मोठ्या प्रमाणात जर तंबाखू सेवन चालू राहिले तर त्यामुळे तोंडाच्या कॅन्सरची जणू लाट येईल अशी भीती जागतिक आरोग्य संघटनेने व्यक्त केली आहे यासाठी नियमितपणे दंत व मुख तपासणी करावी पण फक्त याच दिवशी जनजागृती करावी असे नाही, ही जनजागृती वर्षाचे ३६५ दिवस झाली तरच फरक पडेल, ३१ मे हा दिवस फक्त लोकांना आठवण करून देण्यासाठी आहे की आपण अजूनही तंबाखूजन्य पदार्थापासून मुक्त झालेले नाही, आपली लढाई अजून बाकी आहे, व्यसनमुक्तीसाठी तज्ञांची मते घेणे हेच योग्य असते ज्याप्रमाणे अंधश्रद्धा विकासाच्या आड येतात त्याचप्रमाणे व्यसन सुद्धा विकासाच्या आड येते यासाठी आपण सर्वजण मिळून या व्यसनाधीनतेच्या (पान २ वर)

हार्दीक अभिष्टचिंतन

श्री. आप्पासाहेब के.डी.मिस्तरी
यांना वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा!
-: शुभेच्छूक :-
सौ.चंद्रकला अनिल मोरे — श्री.अनिल त्र्यंबक मोरे
सौ.मीरा प्रदीप सोनवणे — श्री.प्रदीप माधवराव सोनवणे
सौ.वर्षा पांडूरंग गाडेकर — श्री.पांडूरंग एकनाथ गाडेकर
सौ.मंगला राजेंद्र देवरे — श्री.राजेंद्र धनराज देवरे
सौ.सरला संजय दिघे — श्री.संजय विष्णू दिघे
श्री.प्रमोद एकनाथ कासार
आदर्श लॉज, धुळे — सुयोग लॉज, धुळे
महालक्ष्मी कलेक्शन, छ.संभाजीनगर

आपला महाराष्ट्र

# सातपुड्याच्या शोषणामुळे खान्देश तप्त

झारखंड मधील जमशेदपूर येथे तिथल्या आमदाराने राष्ट्रीय नदी पर्वत संमेलन आयोजित केले होते.नुकतेच हे संमेलन संपन्न झाले.आमदार कुठल्या विचारांचा आहे तो प्रश्न गौण असून देशातील पर्यावरणवादी कार्यकर्त्यांना एकत्र बोलावून दोन दिवस नद्या आणि पर्वतांच्या अस्तित्वाविषयी,त्यांचा बचाव कसा करता येईल या विषयी चर्चा घडवून आणली व ठोस असा कार्यक्रम आखला हे महत्वाचे आहे.आपल्या कडे शिकल्या सवरलेल्या,विचारी आमदार खासदारांची कमी नाही पण त्यांना असे काहीच सूचत नाही ही आपली अडचण आहे.करोडो रूपयात स्वतःचा स्वाभिमान सत्तेसाठी गहाण ठेवणारांची आणि पक्ष फोडणारांची आपल्याकडे मांदियाळी आहे. त्यासाठी रात्रीतून ते आसाम मध्ये पळून जाऊ शकतात तरीही आम्ही महाराजांचे मावळे आहोत असे म्हणतात त्यांना असले काही जे जमशेदपूरच्या आमदाराला सूचले तसे मुळीच सुचणार नाही.त्यांचा अजेंडा विभाजनाचा आहे आणि तो ते निष्ठेने राबवितात.त्यांना विधायक असे काहीच माहिती नाही.सगळीकडे नुसते होयबा शासक पक्षाने निवडले आहेत.जमशेदपूरला नदी पर्वत संमेलनात पर्यावरण तज्ज्ञ उपस्थित होते.त्यांनी जे मुद्दे उपस्थित केले ते अत्यंत महत्वाचे आहेत.नद्या आणि पर्वतांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र आणि मजबूत कायदे करण्याची गरज आहे.संमेलनास उपस्थित असलेल्या कायदेतज्ज्ञांनी, पर्यावरणवादी कार्यकर्त्यांनी , सामाजिक कार्यकर्त्यांनी याच विषयावर आपली मते प्रदर्शित केली. हिमालयातील,झारखंडमधील,महाराष्ट्रातील, राजस्थान मध्यप्रदेशातील नद्दि आणि पर्वतांची स्थिती, त्यांच्यावर होणारे हल्ले त्यामुळे वाढणारे धोके,पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम ह्या बाबी अतिशय गंभीर आहेत. सध्या सर्वत्र विकासाची जी संकल्पना मांडण्यात येते आणि राबविण्यात येते ते विनाशाच्या दिशेने नेणारे मॉडेल आहे. विकास आवश्यकच आहे पण कोणाचा हा मुद्दा आहे.सर्वसमावेशक आणि जास्तीत जास्त नाहीरेवाल्या वर्गासाठी विकास हवा.तो निसर्गाशी सहयोगाचा असावा. त्यामुळे पुढच्या पिढ्यांसाठीही नैसर्गिक साधनसंपत्ती शिल्लक राहिली पाहिजे.म्हणूनच या परिषदेत नदी-पर्वत संरक्षण,संवर्धन, आणि सुरक्षेसाठी स्वतंत्र कायदा करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली.विविध सरकारे केवळ पर्वतांचे दोहन करीत नाहीत तर त्यांचे शोषण करीत आले आहेत.दोहन करण्यात मर्यादा आहेत परंतु शोषणाला मर्यादा नसतात.ज्या ज्या प्रदेशातील पर्वतांचे शोषण झाले ती बाब उघड आहे त्यावर पुन्हा पुन्हा भाष्य करण्याची गरज नाही.मात्र काही प्रदेशांची पर्वतांचे नद्यांचे पुनरूज्जीवन करण्याचे प्रयतक चालविले आहेत ती बाब विविध सरकारांनी लक्षात घेऊन ते कार्य हाती घेतले पाहिजे.भारतातील पर्वतांच्या स्थितीचे सातत्याने मूल्यांकन करण्यासाठी राष्ट्रीय मॉनिटरिंग यंत्रणा किंवा प विकसित करण्याची गरज आहे.भारतीय समाज पूर्वजांना तीर्थस्थान आमच्या ठिकाणी मानतो म्हणूनही त्यांचे संरक्षण करणे आवश्यक आहे.त्यासाठी कायद्याची आणि सक्षमपणे राबविण्याची गरज आहे.सर्वोच्च न्यायालयाने एका विशिष्ट शब्दाचा प्रयोग या संदर्भात केला त्यामुळे करावी पर्वत रांगा खाणकामासाठी खुल्या झाल्या.परिणामी भारतीय पर्वत सुरक्षा अधिनियम पारित झाला पाहिजे.पर्वत ही पुढील पिढ्यांची अमूल्य अशी संपत्ती आहे.ती आपण आपल्या पूर्वजांकडून आधारीत घेतलेली आहे.ती सुरक्षित स्वरूपात पुढच्या पिढीच्या हातात देणे हे आपले कर्तव्य आहे.हिमालयातील जुन्या आणि रद्द झालेल्या प्रकल्पांना सुरू करण्यात यावे असा प्रस्ताव सर्वोच्च न्यायालयाकडे पाठविण्यात आलेला आहे ही बाब चिंताजनक म्हणावी लागेल.हे पर्वतांचा विनाश आणि गंगे सारख्या नद्या कोरड्या करण्याचे षडयंत्र आहे.असेच तज्ज्ञांना वाटते. पर्यावरणवाद्यांना नेहमी विकासाचे विरोधक म्हणून हिणवले जाते.त्याबद्दल देशभर नाराजी आहे.परंतु पर्यावरणाची चिंता,नद्यांची चिंता आणि पर्वतांची चिंता त्यांना आहे पुढच्या पिढ्यांसाठी ही धरोहर शिल्लक राहिली पाहिजे यासाठी या मंडळींची धडपड चालू असते. ते विकास विरोधी कसे काय असू शकतात ? महाराष्ट्रातील समृद्धी आणि शक्तीपीठ या सारख्या अतिरिक्त राक्षसी रस्त्यांची गरज नसताना हे प्रकल्प अट्टाहासाने राबविले जात आहेत.त्याचा फायदा फारच निवडक लोकांना अर्थात भांडवलदारांनाच होतो.सर्व सामान्य माणसांसाठी तो विकास नाही.त्या संबंधी बोलणारांना विकास विरोधी ठरविणे गैर आहे.महाराष्ट्रातील शासकांना बड्या दोन तीन भांडवलदारांच्या फायद्यासाठी राज्याची साधन सामुग्री गहाण टाकण्याचा भस्म्या रोग लागलेला आहे.तो थांबविण्यासाठी जमशेदपूर परिषदे सारखे प्रयतक होणे आवश्यक आहे.महाराष्ट्रात सकारात्मक काम करणारांची कमी नाही.त्यांनी जमशेदपूर संमेलनाचा धडा घेतला पाहिजे.संविधानात तरतुद असलेल्या अनुच्छेद ५१(अ)ग) नुसार पर्यावरण संरक्षण हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.मात्र अनुभव वेगळा आहे. नागरिक वृक्षांचे शत्रू बनले.ग्रामपंचायत,नगर पंचायत,नगर परिषद,पालिका,महा पालिका किंवा अन्य विधायक संस्थांनी झाडे लावायची,ती मोठी करायची पण त्या वृक्षांचा त्रास होतो म्हणून कापून टाकायची हा नागरिकांचा अजब खाक्या आहे. वास्तविक कुठल्याही वृक्षाचा माणसाला त्रास होत नाही.उलट वृक्षांनात माणसांचा त्रास होतो.शहरी भागात ही मानसिकता फार आहे.जनावरे ज्या वृक्षांना खात नाहीत अशा सप्तपर्णीची लागवड महापालिकेने केली.ती झाडे मोठी झाली परिसर सुंदर दिसू लागला पण काही लोकांच्या मनाला ते सौंदर्य आवडले नाही.सारखे त्यांना ते खुपत होते. त्यांच्या पैकी कुणातरी तथाकथित तज्ज्ञाने अशी हूल उठवून दिली की, सप्तपर्णीच्या फुलांचा उग्र वास येतो आणि त्यामुळे आमच्या घरात सर्दी झाली.अशा प्रकारचा दुष्प्रचार करणाराने केला मात्र रहिवाश्यांनी सप्त प्रतीची कत्तल सुरू केली.शेकडो वृक्ष तोडून टाकले.ज्यांनी ते वाचविले त्यांच्या घरासमोरच्या झाडाच्या सावलीत तेच तोडणारे आता आपली वाहने ठेवतात. अशी उफराटी मानसिकता लोकांची आहे. जंगलातील झाडे कधीच माणसाची शत्रू नसतात पण उद्या त्यांनाही माणूस शत्रू ठरवून त्यांच्यावर कु-हाड चालवू शकतात. त्यांच्यासाठीच हा कायदा हवा आहे.काही लोक कायदा देखील धाब्यावर बसवतात. ते लाकूड चोर असतात त्यांनाही कायद्याचा बडगा दाखविला जाऊ शकतो.

तसे तर गेल्या ७७ वर्षात देशात पर्यावरणाच्या संरक्षणासाठी अनेक कायदे झाले.पण नद्या आणि पर्वत वाचविण्यासाठी विशेष कायदा नाही.म्हणून संसदेचे विशेष अधिवेशन यासाठी बोलावले पाहिजे.कारण हा माणसाच्या जीवन मरणाशी जुळलेला प्रश्न आहे.गंगा नदीचा विस्तार दिवसेंदिवस कमी होत आहे आसौख्य नद्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे.आपल्या पांझरा नदीचे उदाहरण त्यासाठी पुरेसे आहे.अनेक पर्वत आणि टेकड्या बिल्डरांच्या घशात प्रशासनाने घातल्या आहेत.ते बेछूटपणे तोडले, छाटले जात आहेत.म्हणूनच त्यांना वाचवण्यासाठी सशक्त कायदा झाला पाहिजे.काही पर्यावरण तज्ज्ञ नदीला आई म्हणतात. त्यांनी ही संकल्पना लोकांकडूनच घेतलेली असली तरी लोकच आता मातेच्या जीवावर उठले असून वाळू माफिये हे त्यांचे ज्वलंत उदाहरण म्हणावे लागेल.त्यांनी पर्यावरणावर घाव घालण्याचेच ठरविले आहे.खरेतर ते लोक माता म्हणणाऱ्या संस्कृतीचे पाईक होते पण आता हव्यासापायी ते बिघडले आहेत.पुन्हा नदीला मातेचा सन्मान देण्याची आणि तिच्याकडे केवळ साधन म्हणून न बघण्याची गरज आहे.दामोदर नदीची लांबी ७० टक्क्यांनी कमी झाली.ते अपयश त्या राज्याच्या प्रदुषण नियंत्रण मंडळाचे म्हणावे लागेल.महाराष्ट्रात पांझरा,गिरण्या,गोदावरी,पंचगंगा,मुळा ,मुठा,पुर्णा, इत्यादी नद्या प्रदुषित झाल्या.त्या शुध्द करण्याचा एकही कार्यक्रम महाराष्ट्र शासनाकडे नाही.आता नद्या बारमाही शिस्त नाहीत.त्या संबंधीची अनेक उदाहरणे आहेत.सातपुड्याचे एवढे शोषण झाले की एकही नदी बारमाही वाहत नाही.पावसाळ्यात फार मोठे पूर त्या नद्यांना येतात पर्वतांची धूप झाल्यामुळे संपूर्ण वाळू आणि माती वाहून जाते.परिणामी पर्वत उघडे पडले आहेत.ते उन्हाळ्यात प्रचंड तापतात त्यामुळे कधी नव्हे इतका खान्देश या वर्षी तापला.दरवर्षी असेच चित्र राहील असे दिसते.ते मनुष्य वस्ती उध्वस्त करणारे असेल.पुढच्या पिढ्यांना आपण हेच देणार आहोत काय असा यक्ष प्रश्न निर्माण झालेला आहे.

## वाकी नदीकाठावर अवैध हातभट्टी : पोलिसांचा छापा

शहादा, दि.३१(का.प्र.) म्हसावद पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैध दारू विक्रेत्यांविरुद्ध धडक मोहीम उघडली आहे. फत्तेपूर गावाजवळील वाकी नदीच्या किनारी झाडीझुडपांच्या आडोशाला सुरू असलेल्या अवैध हातभट्टी दारू निर्मिती अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत सुमारे ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, एका संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.३० मे रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास फत्तेपूर (ता. शहादा) गावाजवळील वाकी नदीच्या किनारी काटेरी झाडे व झुडपांच्या आडोशाला अवैधरित्या गावठी हातभट्टीची दारू तयार केली जात असल्याची गुप्त माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश वावरे यांना मिळाली होती. माहिती मिळताच स.पो.नि. वावरे यांनी पथकासह तात्काळ घटनास्थळी धाव घेत सापळा रचला आणि अचानक छापा टाकला.या छाप्यात पोलिसांनी विकास सत्या ठाकरे (वय २७, रा. फत्तेपूर, ता. शहादा, जि. नंदुरबार) या संशयिताला ताब्यात घेतले. त्याच्या ताब्यातून दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य आणि तयार हातभट्टीची दारू जप्त करण्यात आली.कारवाईत १० लोखंडी ड्रम ८ मोटारींच्या ट्यूबमध्ये भरलेली सुमारे ४०० लिटर गावठी दारू,दारू गाळण्यासाठी वापरण्यात येणारे प्लास्टिकचे पाईप असा एकूण अंदाजे किंमत ४५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी पोलीस शिपाई मुकेश ओंकारसिंग राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून म्हसावद पोलीस ठाण्यात संशयित विकास ठाकरे याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर कारवाई म्हसावद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश वावरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, या घटनेचा पुढील तपास सपोनि विठ्ठल पावरा हे करीत आहेत.म्हसावद पोलिसांनी अवैध हातभट्टी दारू निर्मिती आणि विक्री करणाऱ्यांविरोधात अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला आहे. या धडक कारवाईमुळे परिसरातील दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे. अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांवर यापुढेही सातत्याने कडक कारवाई केली जाईल, असा सज्जड इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

## बालवीर चौकात होळकरांना अभिवादन

नंदुरबार,दि.३१ (प्रतिनिधी) - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त शहीद शिरीषकुमार मित्र मंडळातर्फे प्रतिमा पूजनाने अभिवादन करण्यात आले.

बालवीर चौकात आयोजित अभिवादन कार्यक्रमाप्रसंगी धुळे येथील निवृत्त वन क्षेत्रपाल विठ्ठल नागापुरे यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले. याप्रसंगी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष महादू हिरणवाळे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या न्याय, धर्म आणि जनकल्याण याचा आदर्श निर्माण करणाऱ्या राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ऐतिहासिक कार्याला उजाळा दिला. अभिवादन कार्यक्रमास दयानंद सिदलिंग, धनराज सिदलिंग, सतीश सिदलिंग, मनोज गवळी, संतोष गवळी, गोरख नागापुरे, गोटीराम घटी, निवृत्त शिक्षक जी. एस. गवळी, संभाजी हिरणवाळे, सुदाम हिरणवाळे, विशाल हिरणवाळे, यांच्यासह महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पान १ वरुन

## पन्नास ह. सिडबॉलची पहिल्या टप्यात निर्मिती

रवींद्र पाटकरी, आरोग्य विभागाचे लक्ष्मण पाटील, जाधव, मोरे साहेब, अनिल साळुंखे तसेच महानगरपालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ग्रीन धुळे वृक्ष टीम, लायन्स क्लब, निसर्ग मित्र समिती तसेच विविध सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना, पर्यावरणप्रेमी, विद्यार्थी आणि युवकांनी उत्साहाने सहभाग घेतला. सर्वांनी प्रत्यक्ष सीडबॉल तयार करत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या अभियानासाठी बाभूळ, खैर, करंज, गळ्यारी, सिसू, हिरडा, बेहडा, बोर, शतावरी, निमोणी, कांचन, कडई, अमलतास, पळस, आपटा, इंग्रजी चिंच आणि बांबू यांसारख्या विविध देशी वृक्षांच्या बियाण्यांचा वापर करण्यात आला. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली माती, शेणखत आणि बियाण्यांचे मिश्रण करून मोठ्या प्रमाणावर सीडबॉल तयार करण्यात आले.

## ना. जयकुमार रावल यांनी केले अभिवादन

प्रशासनाचा आदर्श निर्माण करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, दोंडाईचा नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष विजय पाटील, दोंडाईचा शहर भाजपाचे अध्यक्ष जितेंद्र गिरासे, प्रवीण महाजन, बांधकाम सभापती मुकेश देवरे, रमेश कुकरेजा, आरोग्य सभापती तथा माजी शहराध्यक्ष संजय तावडे, छोटू सोनवणे, नगरसेवक विजय मराठे, कृष्णा नगराळे, भैया धनगर, हितेंद्र महाले, चतुर पाटील, संजोग रामोळे, रामभाऊ माणिक, राकेश अग्रवाल, चिरंजीव चौधरी, नरेंद्र गिरासे, छोटू मराठे, हर्षल आव्हाड, पुजाताई खडसे, नरेंद्र कोळी, मनोज तेले यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

## निमगुळला व्यसन सोडणाऱ्यांचा सत्कार

विरुद्ध एल्गार करूया, यामुळे भारतीय नागरिकांच आरोग्य स्वस्थ आणि बलशाही होण्यास मदत होईल व्यसन हा एक मानसिक आजार आहे आणि त्यावर उपचार आहे आपला विरोध व्यसनाला आहे व्यसनी व्यक्ती आपली मित्र आहे अशी माहिती कृषी दुकानदार दिलीप खिवसरा यांनी शेतकऱ्यांना पोस्टरद्वारे दिली शेवटी तंबाखू सोडलेल्या शेतकऱ्याचा सत्कार केला व सर्वांनी तंबाखू मुक्तीची शपथ घेतली अशी माहिती कृषी दुकानदार दिलीप खिवसरा यांनी दिली यावेळी शांताराम सूर्यवंशी, दत्तात्रय मोरे, भास्कर सूर्यवंशी, दत्तू बोरसे, अर्जुन सोनवणे, नाना बोरसे, संजय सोनवणे, दिलीप मोरे, हेमराज पवार, भाऊसाहेब पवार, अजय मराठे, सुभाष सोनवणे, आधार सोनवणे, भरत मराठे, मनोज सोनवणे, पंडित सूर्यवंशी, भाऊसाहेब खैरनार, राजेंद्र सोनवणे आदी ग्रामस्थ उपस्थित होते

## राज्य उत्पादन शुल्क कर्मचाऱ्यांची आर्थिक मागणी

परप्रांतातील दारू कोणाकडे येते याची राज्य उत्पादन शुल्क विभागाला कल्पना असतानाही त्यांच्यावर कारवाई होत नाही. अनेकदा कार्यालयात बसून देखील बरबटलेले आपला हिस्सा मागतात व हे सगळे सीसीटीव्ही सुरू असताना होत असल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची दखल घेऊन कारवाई करावी अशी मागणी करण्यात येते.

## जमाव बंदीचे उलंघन वैभव पाडवीवर हल्ला

यांनी फिर्याद दिलयाने सागर रजेसिंग पाडवी,मित जितेंद्र पाडवी, सुमित कांतीलाल पाडवी, जिवानिया पाडवी सर्व रा वाण्याविहीर व विशाल विक्रमसिंग पाडवी रा नाला तसेच अन्य आठ जणांच्या विरोधात अक्कलकूवा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रभारी अधिकारी सारंग नवलकर, यांच्य मार्गदर्शनाखाली अतूल गावित यांच्याकडे तपास देण्यात आला आहे.ही मारहाणीची घटना राजकीय व्देषातून की अन्य़ कारणामुळे हे कळू शकले नाही. जिल्हाधिकारी डॉ मिताली सेठी यांनी जमाव बंदी आदेश लागू केला आहे.अशातच या चौदा जणांनी सार्वजनिक जागेवर एकत्र येत हल्ला केल्याने आदेश बंदीचे उल्लंघन केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गैरप्रकार रोखण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे

धुळे, दि. ३१ (प्रतिनिधी) : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या परीक्षांना एस. एस. व्ही. पी. एस. कला आणि वाणिज्य महाविद्यालयात सुरुवात झाली आहे. यंदा सुमारे तीन हजार विद्यार्थी परीक्षा देत आहेत. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी परीक्षा केंद्रावर आणि प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. विद्यापीठ प्रशासन आणि महाविद्यालयीन व्यवस्थापनाच्या चोख नियोजनामुळे ही परीक्षा पारदर्शक वातावरणात पार पडत आहे.

मुक्त विद्यापीठातून पदवी आणि पदविका संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एकवीस मे ते बारा जून या कालावधीत परीक्षा होत आहेत. या परीक्षांसाठी एस. एस. व्ही. पी. एस. महाविद्यालयाचे केंद्र निश्चित करण्यात आले आहे. या परीक्षा केंद्रावर एस. एस. व्ही. पी. एस. महाविद्यालय, एस. आर. पाटील महाविद्यालय, पालेशा महाविद्यालय, जयहिंद महाविद्यालय आणि योग विद्या धाम या महाविद्यालयांतील तब्बल तीन हजार विद्यार्थी परीक्षा देत आहेत.

### पान १ वरुन

## राजकारण्यांचे घरगडी नाहीत – नगराध्यक्षा

खोडून काढले. यावेळी त्या म्हणाल्या, नगर परिषदेत आजवर सुरू असलेल्या परंपरा आम्ही बंद केल्याने अनेकांना पोटशूळ उठला आहे. चुकीच्या सवयींना खोडा बसल्याने विरोधकांना त्रास होत असला तरी त्यातून तळोद्याच्या जनतेला न्याय मिळतोय, हे महत्त्वाचे आहे. नगरपालिकेचे कर्मचारी जनतेच्या सेवेसाठी असून, यापुढे ते कोणत्याही राजकारण्याचे घरगडी म्हणून काम करणार नाहीत. नगर परिषदेचे कर्मचारी यापुढे केवळ शहरवासीयांना बांधील राहून काम करतील.

विरोधक केवळ काहीतरी मुद्दे काढून राजकारण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांनी सर्वसाधारण सभेपूर्वी भेटून वैयक्तिक समस्या मांडायला हव्या होत्या. तसे न करता हा मुद्दा सर्वसाधारण सभेत मांडण्यात आला. यामागे केवळ वातावरण तापविण्याचा विरोधकांचा उद्देश होता. आम्ही करीत असलेल्या विकास कामांमुळे विरोधकांच्या पोटात दुखत आहे. त्यामुळे ते खोटे बोलून शहरवासीयांची दिशाभूल करण्याचा प्रयतक करीत आहेत, असा आरोपही चौधरी यांनी केला.

यावेळी उपनगराध्यक्ष शीतल पाडवी, राष्ट्रवादीचे गटनेते कल्पेश चौधरी, नगरसेवक रामानंद ठाकरे, अरविंद प्रधान, इझाम खातीक, गायत्री पिंपरे, प्रतिभा पाडवी, मीराबाई कोळी, लक्ष्मी नाईक, हर्ष पाडवी आदी उपस्थित होते.

## येत्या दहा दिवसात कर्जमाफ : कृषी मंत्री भरणे

काळात केलेले जलसंधारणाचे काम आणि त्यांचे विचार आजही मार्गदर्शक आहेत. एका इंग्रज लेखकाचा संदर्भ देत भरणे म्हणाले की, जेव्हा जगातील महान स्त्रियांचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा अहिल्यादेवींचे नाव प्रथम स्थानी असेल. चौंडी गावाचा आणि परिसराचा विकास करण्यासाठी साधारण बाराशे ते तेराशे कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. पुढील दोन-तीन वर्षांत या भागाचे चित्र पूर्णपणे बदलेल, असे त्यांनी सांगितले. हा आराखडा तयार करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राम शिंदे आणि अजित पवार यांनी मोठे सहकार्य केल्याचा उल्लेख त्यांनी केला

## शिरपूरला भल्या पहाटे पावसाच्या सरी

काळातील पावसाच्या नियमिततेवर परिणाम करतो. त्यामुळे आता पाऊस झाला, पण जूनमध्ये खरी गरज असताना तो दडी मारणार नाही ना? अशी चिंता व्यक्त केली जात आहे.

खरीप हंगामाची तयारी सुरू असताना शेतकरी पावसाच्या नियमित आगमनाची वाट पाहत आहेत. पेरणीसाठी योग्य आणि सातत्यपूर्ण पाऊस आवश्यक असतो. सुरुवातीला पाऊस पडून नंतर दीर्घ खंड पडल्यास पेरण्या वाया जाण्याची भीती असते. त्यामुळे शेतकरी सध्या घाईघाईने पेरणी करण्याच्या मनस्थितीत नसल्याचे चित्र आहे.

अलीकडील दिवसांत ढगांच्या हालचालींसह विजांच्या कडकडाटाचे प्रमाण वाढले आहे. पहाटेच्या पावसादरम्यानही काही ठिकाणी विजांचा कडकडाट ऐकू आला. हवामानातील बदलामुळे मेघगर्जनेसह पावसाच्या घटना वाढत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शेतात काम करणारे शेतकरी, मोकळ्या जागेत असलेले नागरिक तसेच जनावरे यांची सुरक्षितता महत्त्वाची ठरत आहे. तज्ज्ञांच्या मते, मे अखेरीस आणि मान्सूनपूर्व काळात विजांचा धोका अधिक असतो. त्यामुळे मेघगर्जना सुरू असताना झाडाखाली उभे राहणे, मोकळ्या मैदानात थांबणे किंवा विद्युत उपकरणांचा वापर करणे टाळण्याचा सल्ला दिला जात आहे.

आता शेतकऱ्यांचे लक्ष मान्सूनच्या नियमित आगमनाकडे लागले आहे. हवामानातील बदल आणि अधूनमधून होणाऱ्या सरींमुळे मान्सूनपूर्व वातावरण तयार होत असले तरी शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना नियमित व समाधानकारक पावसाची प्रतीक्षा आहे. मे महिन्याच्या अखेरच्या दिवशी झालेल्या पावसाने तात्पुरता दिलासा दिला असला, तरी खरी कसोटी जून महिन्यातील पावसाचीच असणार आहे. नियमित आणि वेळेवर होणाऱ्या पावसावरच यंदाच्या खरीप हंगामाचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

## प्रकाश में आज – लोग परलोग




जितेंद्र, जया प्रदा, अमजद खान, प्रेमनाथ, मदनपुरी, जया मालिनी

## शब्दकोडे क्रमांक : २३७९



**आडवे शब्द :** १.भारताची आर्थिक राजधानी ३.वर्ष ४.संस्कृतीनुरूप चालत आलेली ८.श्वास घेण्याची क्रिया १०.वेगळा ११.काळजी १२.शिकार १३. एखादे काम करण्यासाठी घेतलेली अवैध रक्कम १४.ठिकाण १६.नजर १७.गरज १९.रक्त २१.चपाती बनवण्यासाठी वापरतात ते धान्य २२.पाळलेला२४. माज २६.कपाळ २९.वस्तू मोजण्याचे एकक ३०.हजार किलो ३२.वसा उलट लिहा ३३.समूहाने एकत्रित केलेली गर्जना ३५.इंग्रजीत नशीब ३७.अत्यंत गुंतागुंतीचा ३९समीप,लगट ४२.फायदा ४३.हिंदीत आम्ही ४५.युद्ध ४९.दक्ष ५१.उजळणी ५२.दिनांक ५४.तोपर्यंत ५५. कैची ५६.अतूट ५७.नवऱ्याचा भाऊ **उभे शब्द :** १.सतत कार्य करणारा एकजीव २.परमेश्वर ३.लहान ४.भिंतीवर राहणारा एक जीव ५.रोमांच ६.पद्धत ७.जास्तीत जास्त मर्यादा ९.धनसंपन्न असलेला १०.अस्थिर १२.फुलाची पंखुडी १५.घस, खेटून असलेला १६.पत्र १८.हिंदीत भीती २०.हुलकावणी,खोटी भीती २३.सिंह २५.समूह २७.तांबडा २८.सावली ३१.दमयंतीचा पती ३२.छाया ३४.कलिका ३६.हिंदीत मनगट ३८.धैर्य,शौर्य ४०.तिखट मिठाची पुरी ४१. मनाची दोलायमान स्थिती ४४.कणखर ४६.तलवारीचा जोडीदार ४७. नोकर ४८.दान देण्यास मागेपुढे न पाहणारा ५०. सोन्याची परीक्षा घेणारे दगड ५१.एक तुरट चवीचे फळ ५३.विष

### शब्दकोडे क्रमांक : २३७८ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इं | ध | न | ■ | नि | वे | द | न | ■ | बो | क | ड |
| ■ | न | ■ | जु | ना | ■ | वा | ट | स | रू | ■ | हा |
| आ | वा | रा | ■ | द | गा | ■ | व | ल | ■ | का | ळी |
| म | न | ■ | म | ■ | ज | ह | र | ■ | आ | ज | ■ |
| दा | ■ | म | ज | बू | र | ■ | ला | ट | ■ | वा | ढ |
| र | ज | त | ■ | ट | ■ | क | ल | क | ल | ■ | ग |
| ■ | व | ल | य | ■ | वा | स | ■ | ला | ■ | वि | ■ |
| प | ■ | ब | ■ | आ | म | र | स | ■ | क | रा | ड |
| ड | ल | ■ | स | द | न | ■ | ह | वा | ■ | ट | ■ |
| सा | ता | र | क | र | ■ | का | म | ■ | सौ | ■ | प |
| द | ■ | ता | ल | ■ | बे | ■ | त | ह | ■ | ना | गा |
| ■ | शी | ळे | ■ | प | ट | ल | ■ | ल | व | क | र |






## पान १ वरुन

### ई केवायसीला यापुढे मुदतवाढ मिळणार नाही

होती. त्यावेळी राज्यातील जवळपास दोन कोटी शेहचाळीस लाख महिला या योजनेचा लाभ घेत होत्या. मात्र आता ही संख्या घटून एक कोटी सहासष्ट लाखांवर आली आहे. ई-केवायसी करण्याची मुदत तीस एप्रिल रोजी संपली. अंतिम मुदत चुकलेल्या महिलांकडून पुन्हा नोंदणीसाठी अथवा ई-केवायसीसाठी विनंत्या केल्या जात आहेत. पण अधिका-यांनी सांगितले की, पुढील मुदतवाढ देण्याचा कोणताही विचार नाही. ई-केवायसीची मुदत वाढवण्याचा कोणताही प्रस्ताव सरकारसमोर नाही. लाभार्थ्यांना प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला होता, सध्या तरी अतिरिक्त लाभार्थ्यांची नोंदणी करण्याचा कोणताही निर्णय झालेला नाही. डेटाबेसमध्ये कोणताही बदल झालेला नाही, असे त्या अधिकाऱ्याने सांगितले.

अधिकृत आकडेवारीनुसार, लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांच्या संख्येत झालेली ऐंशी लाखांची घट ही अपात्र अर्जदारांना पद्धतशीरपणे वगळण्याचा परिणाम आहे. अधिकाऱ्यांनी नावे वगळण्यामागे अनेक कारणे दिली आहेत. त्यामध्ये अपूर्ण ई-केवायसी, चुकीची किंवा अपूर्ण कागदपत्रे, योजनेचे विशिष्ट पात्रता आणि उत्पन्नाचे निकष पूर्ण करण्यात आलेले अपयश आणि वैयक्तिक माहितीतील विसंगती यांचा समावेश आहे.

#### मे महिन्याचा हप्ता कधी मिळणार?

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना मार्च आणि एप्रिल महिन्याच्या हप्त्याची रक्कम तेरा आणि चौदा मे पासून देण्यास सुरुवात झाली होती. आज मे महिन्याचा अखेरचा दिवस असून लाडक्या बहिणींचे लक्ष मे महिन्याचा हप्ता कधी मिळणार याकडे लागले आहे.

#### सुप्रिया सुळे काय म्हणाल्या?

लाडकी बहीण योजनेतून ऐंशी लाख महिलांना अपात्र ठरविण्यात आले. कारण, निवडणूकीच्या काळात कसलीही खातरजमा न करता घाईघाईने या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. आता साधारणपणे वर्ष दीड वर्षाने सरकारला या योजनेत ८० लाख महिला अपात्र असल्याचा साक्षात्कार व्हावा ही मोठी अजब बाब आहे. हे या सरकारचे राजकीय, प्रशासकीय आणि अंमलबजावणीतील सामूहिक दारुण अपयश आहे, अशी टीका सुप्रिया सुळे यांनी केली.

### जरांगे यांचे उपोषण मध्यरात्री मागे

एका निर्णयावर पोहोचले आणि त्यानंतरच मध्यरात्री जरांगे यांनी उपोषण सोडले. सरकारसमोर जरांगे पाटलांनी आपल्या मागण्यांचा अजेंडा स्पष्ट ठेवला होता, ज्यावर तोडगा काढण्याचे आश्वासन मिळाले आहे: त्या मागण्यांमध्ये मराठवाड्यातील सर्व मराठ्यांना तातडीने कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करणे. सातारा, कोल्हापूर, औंध, पुणे आणि मिरज संस्थानांचे च्या धर्तीवर तात्काळ शासन निर्णय निर्गमित करणे. आंदोलकांवरील महाराष्ट्रातील सर्व सरसकट गुन्हे त्वरित मागे घेणे. आंदोलनात प्राण गमावलेल्यांच्या कुटुंबीयांना महावितरण आणि औद्योगिक विकास महामंडळात नोकरी देण्याचा आदेश काढणे. सारथी संस्थेच्या सर्व थांबलेल्या योजना पुन्हा पूर्ण क्षमतेने सुरू करणे. महामंडळाचे सर्व रखडलेले परतावे ताबडतोब वाटप करणे. कुणबी प्रमाणपत्र मिळालेल्यांना तात्काळ जात वैधता प्रमाणपत्र मिळवून देणे. सद्यस्थितीत असलेली मराठा उपसमिती बरखास्त करणे. कुणबी आणि मराठा समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करणे. जुन्या नोंदी तपासण्यासाठी शिंदे समितीला मुदतवाढ देऊन काम गतीने करणे, या मागण्यांचा समावेश आहे. आता या मागण्यांच्या अंमलबजावणीकडे संपूर्ण मराठा समाजाचे लक्ष लागले असून सरकार यावर किती वेगाने पावले उचलते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### विषारी दारुचे बळी मृतांची संख्या बावीस

राधेश्याम प्रजापती याच्याकडून योगेश वानखेडे पस्तीस लिटरचा एक कॅन सुमारे एक हजार नऊशे रुपयांना खरेदी करत होता. त्यानंतर ही दारू पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील विविध अवैध अड्ड्यांवर सुमारे दोन हजार सातशे रुपये प्रति कॅन दराने विकली जात होती. मात्र अधिक नफा कमावण्यासाठी त्याने ऑनलाईन मागवलेले मिथेनॉल दारूमध्ये मिसळून त्याचे प्रमाण वाढवले. याच घातक मिश्रणामुळे अनेक नागरिकांचा जीव गेल्याचे समोर आले आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य सरकारने या संपूर्ण प्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग केला आहे. पोलिस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने संयुक्त कारवाई करत अवैध दारूच्या नेटवर्कचा शोध सुरू केला आहे. पुणे शहर, पुणे ग्रामीण आणि पिंपरी-चिंचवड या भागांमध्ये पसरलेल्या संपूर्ण साखळीचा तपास सुरू असून दारू तयार करणारे, पुरवठा करणारे आणि विक्री करणारे सर्व संबंधित आरोपी तपासाच्या रडारवर आहेत. या प्रकरणात आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली असून त्यापैकी चार आरोपींना आठ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. तपास पथकाच्या प्रमुखांसह आणखी चार अधिकाऱ्यांवरही निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक नरेंद्र ठाकरे यांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे.

#### प्रकरणाच्या मुळाशी जाण्याचे आदेश

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या पोलिस आयुक्तांशी चर्चा करून संपूर्ण प्रकरणाच्या मुळाशी जाण्याचे आदेश दिले आहेत. विषारी दारू कुठे तयार झाली, त्यामागे कोणते लोक आहेत आणि संपूर्ण साखळी कशी कार्यरत होती याचा शोध घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत.

### पुर्व नियोजना अभावी केव्हाही पाणी सोडले जाई

आवर्तन सोडण्यात आले. यावेळी माजी अध्यक्ष भदाणे म्हणालेत, वाढत्या उन्हाची तीव्रता आणि पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर धुळे ग्रामीण मतदारसंघातील नागरिक व पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी अक्कलपाडा धरणाचे दरवाजे आज काही अंशी उघडण्यात आले. दोन दरवाजे २५ सेंटीमीटरने उचलून ५०० क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सोडण्यात आला आहे.

#### या गावांना मोठा दिलासा

नेर, कुसुंबा, बिलाडी, वरखेडे, कुंडाणे, न्याहळोद, जापी, शिरडाणे, सातरणे, विश्वनाथ, सुकवड, मोहाडी प्र. डांगरी, नूरनगर, अकलाड, मोराणे, मेहेरगाव, वार, कौठळ आदी धुळे ग्रामीणमधील गावांसह अमळनेर व शिंदखेडा तालुक्यातील काही गावांना याचा मोठा फायदा होणार आहे. या गावांमधील पिण्याच्या पाण्याचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. त्यांना दिलासा मिळणार आहे.

#### आमदार राम भदाणे यांची दूरदृष्टी

यावेळी जिल्हा परीषदेचे माजी सदस्य तथा माजी सरपंच शंकरराव खलाणे म्हणालेत, उन्हाळ्यात टंचाई निर्माण होईलच. यादृष्टीने सहा महिन्यापुर्वीच नेमके केव्हा आवर्तन देता येईल, याचे नियोजन आमदार राम भदाणे यांनी केलेले होते. त्यानुसार पाणी सोडण्यात आले. आमदार भदाणे हे दूरदृष्टी असलेले युवा नेते आहेत.

आवर्तन सोडण्या प्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष मनोहर भदाणे, कार्यकारी अभियंता देवेंद्र अग्रवाल, पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी मयूर परदेशी, साक्री उपविभागाचे उपविभागीय अधिकारी अजिंक्य पाटील, कालवा निरीक्षक राकेश अहिरे व रवींद्र बोरसे, लोकप्रतिनिधींमध्ये नेरचे माजी सरपंच शंकरराव खलाणे, आनंदखेडेचे सरपंच तुळशीदास अहिरे, भदाणेचे सरपंच भीमा गोयकर, उपसरपंच विठ्ठल पाटील, पिंटू भास्कर, रमेश कारंडे, गंगाराम महारनर, गोरख कारंडे, कारभारी खलाणे, रवींद्र भदाणे, किरण खलाणे, वसंत बोरसे, प्रवीण जाधव, आनंदखेडेचे उपसरपंच मनोज गवते, रविकांत सानप, माजी पंचायत समिती सदस्य मुकेश पवार, अप्पा महारनर, आणि आमदार प्रतिनिधी राहुल पाटील (जलसंपदा विभाग) यांच्यासह विविध गावांचे सरपंच, उपसरपंच, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने हजर होते.

#### ग्रामस्थ म्हणतात...

ग्रामीण भागातील पाणीटंचाईचा प्रश्न सोडवण्यासाठी ठोस पावले उचलली जात आहेत. हे आवर्तन सुटल्यामुळे ग्रामस्थांना आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे, अशी भावना उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## देवरे अभियांत्रिकीत सोलर ड्रायर प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न

**धुळे, दि.३१ - श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे बापूसाहेब शिवाजीराव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालय व ला फाउंडेशन (डसॉल्ट सिस्टिम्स) व कृषी विज्ञान केंद्र धुळे यांच्या सहकार्याने एक टन क्षमतेच्या सौर उर्जा आधारित (हेमीस्फेरीकल सोलर ड्रायर) प्रशिक्षण आणि तंत्रज्ञान प्रसार एक दिवसाच्या कार्यशाळेचा शुभारंभ काल सकाळी महाविद्यालय सभागृहात उपाध्यक्ष मा बापूसाहेब प्रफुल्ल शिसोदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.**




याप्रसंगी प्रमुख अतिथी श्री. हेमंत गाडगीळ कार्यक्रम संचालक आणि मार्गदर्शक, ला फाउंडेशन डसॉल्ट सिस्टिम्स, श्री सलीम हुजेफा संचालक, ला फाउंडेशन डसॉल्ट सिस्टिम्स, श्री गिथिन व्ही चंद्रन लीड आर एस व्ही सी, पी एस ए अंतर्गत भारत सरकार (ऑनलाइन) दृकश्राव्य प्रणाली द्वारे उपस्थित होते. तसेच या प्रसंगी मान्यवर पाहुणे म्हणून सन्माननीय अतिथी श्री साहेबचंदजी जैन अध्यक्ष किसान संघ धुळे जिल्हा, श्री देवेंद्रजी एम सूर्यवंशी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अफाश्री सोल्युशन्स प्रा ली, श्रीमती अमृता ए राऊत विषय तज्ज्ञ, कृषी विज्ञान केंद्र धुळे श्री. शशिकांत एस नहिरे लीड - संशोधन आणि प्रजनन, बीजो सीड्स इंडिया प्रा लि पुणे व सुशील पाटील प्रकल्प व्यवस्थापक, ला फाउंडेशन यांची व्यासपीठावर उपस्थिती लाभली होती. संस्थेचे उपाध्यक्ष मा बापूसाहेब प्रफुल्ल शिसोदे, देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ हितेंद्र पाटील, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा डॉ एस डी सूर्यवंशी, प्रा धनंजय नेवाडकर व्यासपीठावर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने कार्यशाळेचा शुभारंभ झाला. कृषी उत्पादने वाळवणी व निर्जंतुकीकरणा साठी हे सोलर ड्रायर अतिशय उपयुक्त आहे. शेतकरी, महिला बचत गट, कृषी सखी, कृषी क्षेत्रातील संशोधक विद्यार्थी, व शेतीवर आधारित उद्योजक यांच्या साठी ही सोलर ड्रायर कार्यशाळा उपयुक्त ठरणार आहे असा सूर मान्यवरांनी मांडला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ हितेंद्र पाटील यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळेची संकल्पना मांडली व सोलर ड्रायर च्या उपयुक्ततेबाबत उपस्थितांना अवगत केले. या कार्यशाळेत दिडशे हून अधिक कृषी क्षेत्रातील महिला पुरुष प्रतिनिधी सहभागी झाले होते त्यांना सोलर ड्रायर चे प्रात्यक्षिक वर्कशॉप इमारती वर मध्ये दाखवण्यात आले.

या प्रसंगी देशातील दुसऱ्या रूटैग स्मार्ट व्हिलेज सेंटर चे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले व एक टन क्षमतेच्या सोलर ड्रायर प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. मा डॉ शशी नहिरे पुणे यांनी त्यांच्या भाषणातून सोलर ड्रायर च्या उपयुक्ततेबाबत व ग्रामीण भागातील अर्थ व्यवस्थेसाठी सोलर ड्रायर पूरक असल्याचे मत मांडले. मा साहेबचंदजी जैन यांनी कृषी आधारित उद्योगांसाठी सोलर ड्रायर चे महत्त्व अधोरेखित केले. श्री देवेंद्र जी सूर्यवंशी यांनी ग्रामीण भागातील कृषी आधारीत उद्योगांचे महत्त्व व त्यासाठी चे वित्तीय सहाय्य यावर मार्गदर्शन केले. मा सौ अमृता राऊत यांनी विविध कृषी उत्पादनांसाठी सोलर ड्रायर चे महत्त्व व त्यायोगे होणारे अर्थकारण यावर प्रकाश झोत टाकला. या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते सोलर ड्रायर माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. मेकॅनिकल विभाग प्रमुख प्रा डॉ एस डी सूर्यवंशी यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन द्वारे एक टन क्षमतेच्या सोलर ड्रायर प्रकल्पाची तांत्रिक माहिती विशद केली व प्रात्यक्षिकांसह प्रकल्पाची उपयुक्तता अधोरेखीत केली. श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा बाबासाहेब कुणाल पाटील, महाविद्यालयाचे अध्यक्ष मा दादा साहेब सुभाष देवरे, उद्योजक मा विलास देवरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात एनर्जी फॉर फ्युचर क्लबचे सदस्य व मेकॅनिकल डिपार्टमेंटने या कार्यशाळेचे संयोजन केले. समन्वयक प्रा इंद्रजीत वानखेडे यांनी कार्यशाहेचे संयोजन केले.

## आयकर कायद्यावर कुलकर्णींचे मार्गदर्शन

धुळे, दि. ३१ - अनेकविध सामाजिक उपक्रमांसाठी अग्रेसर असलेल्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ धुळे तर्फे सुपरिचित सनदी लेखापाल व देऋब्रा संघ धुळे अध्यक्ष सीए राजाराम कुलकर्णी यांचे आयकर कायदा या विषयावर मार्गदर्शन पर व्याख्यान नुकतेच नवग्रहीतील त्रिविक्रम मंदिर संस्थान च्या रामभाऊ गरुड मंगल कार्यालयात संपन्न झाले. कर आकारणीचे विविध टप्पे, आयकर दर, कर वजावटीचे निकष, नोकरदार व्यावसायिकां साठी आयकर कायद्यातील तरतूदी, पॅन व आयकर रिटर्न्स चे महत्त्व, आयकर रिटर्न्स भरताना घ्यायची काळजी याबाबत माहिती देण्यात आली.

जिवेत शरद : शरणम्



श्री.आप्पासाहेब के.डी.मिस्तरी (माजी महापौर)
यांना वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा
-: शुभेच्छुक :-
दिनेश (गोटू) शार्दुल
(माजी नगरसेवक)
इंजि.विवेक शार्दुल इंजि.अक्षय शार्दुल
विश्व डेव्हलपर्स
विश्व एन्टरप्राईजेस, नासिक

जी.के. आर्केड या रिअल इस्टेट प्रोजेक्टसाठी
सेल्स प्रतिनिधी पाहिजेत
GK ARCADE Shops & Luxurious Flats
नकाणे रोडवरील फ्लॅट, शॉप्स व बोरकुंड व आर्वी येथील प्लॉटींग ले-आऊट च्या विक्रीसाठी आम्हाला कष्टाळू आणि महत्त्वाकांक्षी सेल्स प्रतिनिधींची गरज आहे.
प्रॉपर्टी ब्रोकर्स आमंत्रित
आकर्षक कमिशन मिळवण्याची सुवर्णसंधी!
रिअल इस्टेट क्षेत्रात करिअर करण्याची उत्तम संधी...
पात्रता: कोणत्याही शाखेचा पदवीधर, ग्राहकांशी उत्तम संवाद साधण्याची कला अवगत असावी. रिअल इस्टेट किंवा कोणत्याही मार्केटिंग क्षेत्रातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य, स्वतःची दुचाकी असणे आवश्यक.
आजच संपर्क साधा! जी.के.आर्केड संपर्क : 88881 92677 94227 92677

हार्दिक अभिष्टचिंतन



श्री.दिलीप आप्पा साळवे
लोकजनशक्ती पार्टी उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष धुळे (जिल्हा) यांना वाढदिवसा निमित्त हार्दिक शुभेच्छा.
शुभेच्छुक- दिलीप भावसार
भावसार टी.व्ही.सेन्टर, धुळे.

WALK-IN-INTERVIEW
DATE : 2nd, 3rd, 4th June 2026
Required Female Teacher
For Std. 1st to 10th
Teachers - 08 Post (Ladies)
D.Ed / B.Ed./ B.Sc / M.Sc/ B.A./ M.A.
- Address of Interview -
Horizon International School
Parola Road, Ajang, Dhule Mob. 9767636755
शिक्षकांसाठी ने-आण करण्यासाठी बसची (व्हॅनची) सुविधा आहे.

सेल्समन पाहिजे
जिओ (Jio) कंपनीच्या ऑक्टिव्हिटी आणि मार्केटिंग कामासाठी उमेदवाराकडे स्वत: स्मार्टफोन आणि वाहन असणे आवश्यक आहे. इच्छुकांनी आपला बायोडेटा घेऊन खालील पत्यावर संपर्क साधावा.
श्री साई एजन्सी
राजमहाल बिल्डिंग, पारोळा रोड, धुळे -४२४००१ मो. - 7757899399

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

अनारसे
खास अधिक मासा साठी उत्तम प्रतीचे अनारसे मिळतील नोंदणी आवश्यक आहे.
अनारसा पिठ उपलब्ध आहे.
मदर्स किचन
फूलवाला चौक,धुळे
9049902201
7887750864

पाहिजे
दुकान कामासाठी होतकरू मुलगा पाहिजे.
राधेकृष्ण ऑटो मोबाईल्स्
बारा पत्थर धुळे
8669067006
9420439551

पाहिजेत
नर्स महिला ANM, GNM
वरदान लहान मुलांचे हॉस्पिटल
स्टेशन रोड, रेल्वे स्टेशन समोर, धुळे
-: संपर्क :-
9175496933
8390778336

पाहिजेत
अनुभवी मॅनेजर, ड्रायव्हर वॉचमन (फॅमिलीसह)
अर्जासह समक्ष भेटा
सकाळी १० ते सायं.७
अनुभव असल्यास प्राधान्य
राधाकृष्ण मंगल कार्यालय
नकाणे रोड, रूपामाई शाळेजवळ, धुळे
मो.९३०९५३१६६५
९४२२२९६२०५

पाहिजेत
लॉजींग कामासाठी निर्व्यसनी मॅनेजर व वेटर पाहिजे.
- सक्षम भेटा -
आदर्श लॉज
जेलरोड धुळे

ड्रायव्हर पाहिजे
बर्फाच्या गाडीसाठी सकाळी लवकर येणारा ड्रायव्हर पाहिजे.
मुंदडा आईस फॅक्टरी

पाहिजेत
• नर्स (ANM GNM)
• R.M.O
• रिसेप्शनिस्ट
• B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर अकाऊंट कामासाठी माणूस पाहिजे.
पत्ता- ग.नं.५, धुळे
मो.९७६५३७३५५९
९४०४३४४९९९

मंगल कार्यालय
सूरते मंगल कार्यालय खास पावसाळ्यासाठी बूकींग संपर्क
विद्यानगरी देवपूर, धुळे
-: संपर्क :-
9823382447

कुलिंग इंडिया की पहचान
Symphony Crompton
आत्ता पर्यंतच्या कुलरच्या तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स्'



आता खरेदी करा कूलर 0% EMI वर
BAJAJ FINSERV 0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू*
ak media- 238222
58 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

वाढदिवस अभिष्टचिंतन!



श्री. आप्पासाहेब के.डी.मिस्तरी यांना वाढदिवसाच्या मन:पुर्वक शुभेच्छा!

: शुभेच्छूक :

सौ.परिष्णा जोशू एलजीमट्टम, एम.एस.(आस्ट्रेलीया) श्री.जोशू थॉमस एलजीमट्टम, एम.एस.(आस्ट्रेलीया)
डॉ.विभूती चेतन देशमुख, एम्.डी.एस.(ठाणे) डॉ.चेतन विनय देशमुख, एम्.डी.एस.(ठाणे)
सौ.दिव्या षण्मुख शार्दुल, बी.ए.(धुळे) श्री.षण्मुख संजय शार्दुल, एम.ई(धुळे)
सौ.प्रियंका कुणाल गाडेकर, बी.ए.(छ.संभाजीनगर) श्री.कुणाल पांडुरंग गाडेकर, बी.ई.(छ.संभाजीनगर)
सौ.भावना सागर शार्दुल, डी.सी.ई.(पूणे) श्री.सागर दिलीप शार्दुल, बी.ई(पूणे)
डॉ.कांचन परेश सोनवणे, एम्.डी.एस.(नासिक) डॉ.परेश प्रदीप सोनवणे, बी.डी.एस.(नासिक)
सौ.कल्याणी रोहीत गाडेकर, बी.ई.(छ.संभाजीनगर) श्री.रोहीत पांडुरंग गाडेकर, एम.एस.(छ.संभाजीनगर)
डॉ.मानसी पराग शिंदे, बी.डी.एस.(पूणे) श्री.पराग धनराज शिंदे, बी.ई.एम.बी.ए (पूणे)
सौ.श्वेता तेजस मोरे, बी.टेक(डोंबीवली) श्री.तेजस सुरेश मोरे, बी.ई.एम.बी.ए(डोंबीवली)
डॉ.गायत्री दिलीप शार्दुल, एम्.डी.एस.(पूणे) कु.ममता संजय दिघे, हॉटेल मॅनेजमेंट (धुळे)
चि.लक्ष्मीनारायण संजय शार्दुल, सी.ए. (धुळे) चि.मानस संजय दिघे, बी.कॉम (धुळे)

काय उपमा द्यावी आजोबांना!
सुगी नसतांनाही, दाणे आणलेत कणसांना!!

सर्व नातवंडांकडून आप्पाबाबांना वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा !

संकल्प दातांचा दवाखाना, नासिक/धुळे ग्रँडप्पाज लव्ह पेस्ट्रीज, धुळे

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०